# ४) मूलदेव-धुत्तस्स अक्खाणअं

प्राकृत साहित्यामध्ये आचार्य हरिभद्रसूरी हे अत्यंत विद्वान ग्रंथकार, तत्त्ववेत्ते, धर्मप्रचारक होऊन गेले. त्यांनी जवळ जवळ १५० ग्रंथांची निर्मिती केली असे म्हटले जाते. त्यामध्ये 'समरादित्यकथा' आणि 'धूर्ताख्यान' हे ग्रंथ साहित्याच्या दृष्टीने विशेष प्रसिद्ध आहेत. हरिभद्रसूरी हे पुरोगामी विचारांचे लेखक, कवी, धार्मिक तत्त्ववेत्ते होते. त्यांनी रामायण, महाभारत, पुराण इ. ग्रंथांमधील अद्भुतता, अतिशयोक्ती तसेच काही असंभव काल्पनिक घटना 'धूर्ताख्यान' या ग्रंथात व्यंगप्रधान शैलीतून प्रभावीपणे मांडल्या आहेत.

पावसाळ्यामध्ये निवाऱ्यासाठी नगरउद्यानात सर्व धूर्त एकत्र आले होते. सर्व धूर्तांनी आपल्याला आलेले साहसी व अद्भुत अनुभव रामायण, महाभारत, पुराण या ग्रंथांच्या आधारे सांगावेत अशी मूलदेव आपल्या धूर्त मित्रांना विनंती करतो. तेव्हा सर्व धूर्त मूलदेवाच्या विचारांशी सहमत होऊन मूलदेवासच विनंती करतात, की 'प्रथम आपणच आपल्या अभूतपूर्व घटनांचे, स्वानुभवाचे कथन करावे' तेव्हा धूर्त मूलदेव आपले अनुभव पुढीलप्रमाणे कथन करतो.

अह भणइ मूलदेवो, 'जं अणुभूअं मए तरुण-भावे।
तं णिसुणेह अवहिआ, कहिज्जमाणं सुजुत्तीए।।१।।

तरुणत्तणम्मि अहअं, इच्छिअ-सुह-संपयं अहिलसंतो।
धारा-धरणट्ठाए, सामि-गिहं पत्थिओ सुइरं।।२।।

छत्त-कमंडलु-हत्थो, पंथं वाहेमि गहिअ-पच्छयणो।
मत्तं पव्वय इत्तं, पिच्छामि अ गय-वरं इंतं।।३।।

मेहमिव गुल-गुलिंतं, पभिण्ण-करडामुहं महामत्तं।
दट्ठूण वण-गइंदं, भएण वेवंत-गत्तो हं।।४।।

अत्ताणो अ असरणो, कत्थ णिलुक्कामि हं ति चिंतंतो।
तो सहसा अ अइगओ, कमंडलुं मरण-भय-भीओ।।५।।

अह सो वि मत्त-हत्थी, ऊसविअ-करो सरोस-रत्तच्छो।
मज्झाणुमग्ग-लग्गो, कमंडलुं अइगओ सिग्घं।।६।।



तो हं भय-संभंतो, समंतओ विद्दुअं पलोअंतो।
हत्थिं कमंडलुम्मी, वामोहेऊण छम्मासं।।७।।

गीवाइ णिग्गओ हं, हत्थी वि ममाणुमग्गओ णिग्गंतो।
लग्गो बालऽग्गंते, कुंडिअ-गीवाइ छिद्दम्मि।।८।।

अहमवि अ णवरि पुरओ, गंगं पिच्छामि रंगिर-तरंगं।
फेण-णिअरऽट्टहासं, वण-गय-दंत-क्खय-तडग्गं।।९।।

पहमण्णं अलहंतो तो, हं इसुवेअ-वाहिणिं सिग्घं।
बाहाहिं समुत्तिण्णो, गोपयमिव भारहिं विउलं।।१०।।

तो सामि-गिहं गंतुं, छुह-तण्हा-परिसहेहिं सहमाणो।
छम्मासा सीसेणं, धरेमि धारा धरट्ठाए।।११।।

धारेऊण य धारं, पयओ अहिवंदिऊण महसेणं।
संपत्तो उज्जेणिं तुब्भेहिं, समं च मिलिओ हं।।१२।।

तो जइ सच्चं एअं, तो मे हेऊहिं पत्तिआवेह।
अह मण्णह अलिअं तं, धुत्ताणं देह तो भत्तं'।।१३।।

अइ भणइ कंडरीओ, 'को भणिही तुममसच्च-वयणं ति।
भारह-पुराण-रामायणाणि, पुरिसो विआणंतो'।।१४।।

परिभणइ मूलदेवो, 'सो हत्थी कुंडिआइ कह माओ?
कह भमिओ छम्मासं, कमंडले तम्मि वणहत्थी।।१५।।

सुहुम-च्छिद्देण कमंडलाओ, कह णिग्गओ अहं सो अ।
णिग्गंतो वणहत्थी, बालऽग्गंते कहं लग्गो।।१६।।

कह गंगा उत्तिण्णा, बाहाहिं मए सुदूरतर-पारा।
कह छम्मासं धरिआ, भुक्खिअ-तिसिएण-उदय-धारा?'।।१७।।

## सद्दत्था

**तरुणभावे** – तरुणावस्थेत
**अवहिआ** – सावधचित्ताने
**सुजुत्तीए** – युक्तिपूर्वक, तर्कशुद्ध
**अहअं**– मी
**अहिलसंतो** – अभिलाषा किंवा इच्छा करीत
**धाराधरणट्ठाए** – (जल) धारा धारण करण्यासाठी
**सुइरं**– खूप वेळ (क्रियाविशेषण)
**वाहेमि** – चालत होतो, जात होतो
**पच्छयणो** – शिदोरी
**मत्तं** – मदोन्मत्त
**इत्तं**– एवढा
**पिच्छामि** – पाहिले
**इंतं**– येणारा
**गुलगुलिंतं**– हत्तीचा चीत्कार, गडगडाट
**पभिण्णकरडामुहं** – उन्मळलेल्या वृक्षाप्रमाणे मुख असणारा
**वेवंतगत्तो** – थरथरणारे शरीर असलेला
**अत्ताणो** – त्राण नसलेला
**असरण** – निराधार
**कत्थ णिलुक्कामि** – मी कोठे लपू ?
**अइगओ** – आत शिरला

**ऊसविअकरो–** सोंड उंचावलेला
**रत्तच्छो–** लाल डोळे असणारा
**विद्दुअं –** त्रासलेला
**वामोहेऊण –** वशीकरण मंत्र उच्चारून
**णिग्गंतो –** निघत असताना
**बालग्गंते–** शेपटीचा मागील भाग
**कुंडिअ –** कमंडलू
**गीवाइ –** मानेतून (पंचमी वि.) किंवा तोटीतून
**रंगिर –** इकडे तिकडे वाहणाऱ्या, उसळणाऱ्या
**फेणणिअर–** फेसाचा समूह
**अट्टहासं–** जोराचा आवाज
**तडग्गं–** किनाऱ्याचे / कडेचे टोक
**पहमण्णं–** पहं+अण्णं– दुसरा मार्ग
**इसुवेअवाहिणिं –** धनुष्यातून सुटलेल्या बाणा प्रमाणे वेगाने वाहणारी
**समुत्तिण्णो –** तरून गेला, ओलांडले
**गोपयमिव –** गोपदाप्रमाणे (गाईच्या पाया इतके माप)
**छुहतण्हापरिसह–** भूक तहान इ. त्रास
**पत्तिआवेह –** पुरावा किंवा प्रचिती द्या
**सुदूरतरपारा –** पार करण्यास अत्यंत कठीण
**भुक्खिअतिसिएण–** भुकेलेल्या तहानलेल्या
**उदय –** पाणी

## सज्झाओ

**१) माध्यम भाषेत भाषांतर करा.**

१) मेहमिव ...... वेवंत-गत्तो हं।।
२) अह सो वि ...... सिग्घं।।
३) पहमण्णं ...... विउलं।।
४) कह गंगा ...... उदयधारा।।

**२) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) मूलदेव स्वामिगृही गेला ते कारण सांगा.
२) नदीच्या तटाला दिलेली उपमा लिहा.
३) हत्तीचा कमंडलू मध्ये राहण्याचा काळ सांगा.
४) नदीच्या वेगाला दिलेली उपमा सांगा.

**३) खालील प्रश्नांची तीन ते चार वाक्यात उत्तरे द्या.**

१) जंगली हत्तीला बघून मूलदेवाच्या झालेल्या अवस्थेचे विवेचन करा.
२) वनहत्तीचे वर्णन करा.
३) गंगानदीची वैशिष्ट्ये सांगा.
४) मूलदेवाने धूर्तांना विचारलेल्या प्रश्नांचे विवेचन करा.

**४) संदर्भासह स्पष्टीकरण द्या.**

१) तं णिसुणेह अवहिआ।
२) को भणिही तुममसच्च-वयणं ति।
३) सो हत्थी कुंडिआइ कह माओ।
४) अह मण्णह अलिअं तं धुत्ताणं देह तो भत्तं।

**५) पाठातून योग्य शब्द निवडून गाथा पूर्ण करा.**

१) .....-.....-हत्थो पंथं वाहेमि गहिअ-.......।
२) ...... कमंडलुं अइगओ सिग्घं।
३) दट्ठूण ...... भएण वेवंत-गत्तो हं।
४) बाहाहिं ...... गोपयमिव भारहिं विउलं।

**६) समास ओळखून विग्रह करा.**

१) भारहपुराणरामायणाणि –
२) सुजुत्तीए –
३) इच्छिअसुहसंपयं –
४) इसुवेअवाहिणिं –
५) छुहतण्हापरिसहेहिं –

**७) रूपे ओळखा.**

१) सुजुत्तीए २) कहिज्जमाणं ३) तरुणत्तणम्मि
४) सामिगिहं ५) दट्ठूण ६) पलोअंतो
७) गंतुं ८) मण्णह

**८) खालील यादीतून सर्वनामे व अव्यये वेगळी करून कोष्टक तयार करा.**

हं, जं, अहअं, अ, अवि, सुइरं, अहं, णवरि, इव, समं, जइ, कह

**९) या पाठातील वर्तमानकाळवाचक विशेषणे ओळखून तक्ता तयार करा.(धातू, प्रत्यय आणि व्याकरण)**